N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** पलूस
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0059 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/04/2025 05:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 02/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/04/2025
**Time From (वेळेपासून):** 16:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/04/2025 **Time (वेळ):** 00:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/04/2025 04:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पलुस पोलीस ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. अल्फाज फिरोज मुल्ला मुल्ला

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय़.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बांबवडे, ,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बांबवडे, ,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 99-9595546456

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. महेश बाळासो गायकवाड | | | 1. प्रथमेश अपार्टमेंट,पलुस ,पलुस , पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|





Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
वर्दी जबाब दि. 03.04.2025

मी अल्फाज फिरोज मुल्ला, वय 26 वर्ष, व्यवसाय:- हॉटेल चालक व फॉरेक्स ट्रेडींग रा. मु.पो.बांबवडे, ता. पलूस जि. सांगली. मो.नं. 9595546456

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासह राहणेस आहे. माझा येळावी फाटा बांबवडे रोड येथे मैफील नावचे हॉटेल असून सध्या हॉटेलचे बांधकाम सुरु आहे. तसेच मी फॉरेक्स ट्रेडींग देखील करतो.

दि.05.10.2024 रोजी श्री. अखिलेश जयकर पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरून पलूस पोलीस ठाणे येथे गु.र. नं. 190/2024, भारतीय न्याय संहिता कलम 118(2), 115, 189(2), 189(4), 191(1), 191(3), 190 अन्वये आरोपी गणेश सावकर भिसे वगैरे 6 यांचेविरुध्द मारहाणीचा गुन्हा दाखल झाला होता. त्या गुन्हयामध्ये मला दि.14.10.2024 रोजी सहआरोपी केले होते. त्या गुन्हयाचा तपास पीएसआय महेश गायकवाड, पलूस पो. ठाणे हे करीत आहेत.

दि.04.01.2025 रोजी पलूस येथील किसान टायर्स दुकाना जवळून मला पीएसआय महेश गायकवाड यांनी माझी बी.एम.डब्ल्यु वाहन क्र. एमएच 10 बीएक्स 6001 वाहनास ताब्यात घेवून पलूस पोलीस ठाणे येथे घेवून आले होते. त्यावेळी पीएसआय गायकवाड साहेब यांनी मला माझेविरुध्द दाखल गुन्हयामध्ये अटक न करणेसाठी व माझी कार जप्त न करण्यासाठी माझ्याकडे 10 लाख रूपयांची मागणी केली होती. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे ऐवढे पैसे नसल्याचे सांगून माझा त्या गुन्हयामध्ये काहीएक संबंध नसल्याचे सांगितले होते. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी मला लागलीच 2 लाख रूपये आणून देण्यास सांगून पैसे दिले नाहीतर मला अटक करून जेलमध्ये टाकीन अशी भिती घातली होती. त्यावेळी मी भितीपोटी त्यांना त्याचदिवशी माझे एचडीएफसी बँक शाखा, पलूस येथून एटीएम व्दारे टप्प्या-टप्प्याने रक्कम काढून एकुण 2 लाख रूपये पी.एस.आय. श्री. गायकवाड यांना पलूस पोलीस ठाणे येथे आणून दिले होते. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी मला माझे गाडीसह सोडून देवून मला अटकपुर्व जामीन घेण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मी प्रथम विटा जिल्हा सत्र न्यायालय येथे जामीन अर्ज दाखल केला होता. परंतू माझा जामीनअर्ज नामंजूर झाल्याने मी मुंबई उच्च न्यायालय येथून दि. 20.01.2025 रोजी माझा अटकपुर्व जामीन घेतला होता.

त्यानंतर गायकवाड साहेब हे मागील 2 महिन्यापासून मला वारंवार फोन करून माझेविरूध्द दाखल गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तसेच माझी बी.एम.डब्ल्यु कार जप्त न करण्यासाठी माझ्याकडे उर्वरित 8 लाख रूपयांची मागणी करीत होते.

दि. 25.03.2025 रोजी पी.एस.आय. श्री. गायकवाड यांनी माझे व्हॉट्सअप नंबर 9595546456 यावर त्यांचे व्हॉट्सअप नंबर 9421843402 वरुन मला "पलूस पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक 190/2024 द्व्म एच् ऋड्ध्य 118(2) वगैरे गुन्हयाचे तपास कामी" वगैरे हजर राहणेबाबतचा मॅसेज सकाळी 07.56 वा पाठविला होता. त्यावेळी मी त्याच दिवशी दुपारच्या वेळेस पलूस पोलीस ठाणे येथे जावून गायकवाड साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी माझ्याविरुध्द दाखल गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तसेच माझी बी.एम.डब्ल्यु कार जप्त न करण्यासाठी तसेच मी फॉरेक्स ट्रेडींग मधून छच्चाच्र करन्सी मध्ये पैसे लावून लोकांची फसवुणक करीत असल्याचे सांगून माझ्याविरूध्द सायबर व फसवणुकीचा गुन्हा दाखल करणार अशी भिती घालून माझ्याकडे उर्वरित 8 लाख रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे ऐवढे पैसे नसल्याचे सांगितले होते. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी पैसे दिले नाहीतर माझी बी.एम.डब्ल्यु. कार जप्त करून माझ्याविरुध्द सायबर व फसवणुकीचा गुन्हा दाखल करणार अशी भिती घातली होती.

त्यानंतर दि. 29.03.2025 रोजी गायकवाड साहेब यांनी त्यांचे व्हॉट्सअप नंबरवरून माझे मोबाईलवर



Scanned with OKEN Scanner

"गुन्हयाचे तपासकामी, गुन्हयातील कार व युएसडीटी ट्रेडींग संदर्भात तपास करण्यासाठी हजर राहणेबाबत" वगैरे मेजेस पाठविला होता. त्यावेळी गायकवाड साहेब हे माझ्याकडे पैसे मागतील या भितीने मी त्यांचेकडे गेलो नव्हतो.

मला श्री. महेश गायकवाड, पी.एस.आय. पलूस पो.ठाणे यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दि. 01.04.2025 रोजी रात्री 09.00 वा चे सुमारास पोलीस उपअधीक्षक श्री. उमेश पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनव्दारे संपर्क करून माझी श्री. महेश गायकवाड, पी.एस.आय. यांचेविरुध्द लाच मागणीबाबतची तक्रार कळविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला दि.02.04.2025 रोजी सकाळी 11.00 वा बांबवडे येथे पथकासह येत असल्याचे सांगून आलेनंतर संपर्क करीत असल्याचे सांगून गोपनियता राखणेच्या सुचना दिल्या.

दि. 02.04.2025 रोजी 11.10 वा चे सुमारास मी पाटील साहेब यांची बांबवडे येथील लक्ष्मी मंदीर जवळ भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा श्री. गायकवाड, पीएसआय यांचेविरूध्दचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज पाटील साहेबांचे समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर पाटील साहेब यांनी वाचून सही केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी त्यांचे सोबत असले दोन शासकीय पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून स्वप्नील सुरेश वरुडे यांनी व पंच नं.2 म्हणून सागर कृष्णात पाटील यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष कथन केली व माझा तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर श्री. महेश गायकवाड, पी.एस.आय. यांचा ठाव-ठिकाणा निश्चित करण्यासाठी माझे मोबाईलवरून गायकवाड साहेब यांचे मोबाईल वर कॉल करून पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल वरून गायकवाड साहेब यांचे मोबाईल नंबर 9421843402 वर 11.19 वा चे सुमारास पंचांसमक्ष कॉल केला असता त्यांनी मला पलूस पोलीस ठाणेच्या बाहेर भेटण्यास बोलविले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.38 वा सुरु करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 स्वप्नील वरुडे असे माझेकडील होंडा अँक्टीव्हा मोपेड क्र. एमएच 10 डीवाय 6050 वरून रवाना होवून पलूस पोलीस ठाणे येथे दाखल झालो. त्यावेळी मी माझे मोबाईलवरून गायकवाड साहेब यांचे मोबाईल नंबर 9421843402 वर कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी मी त्यांना पोलीस ठाणेचे बाहेर आले असल्याचे सांगितले. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी माझेसोबत कोण आहे अशी विचारणा केली असता मी त्यांना मावसभाव सोबत असल्याचे सांगितले. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी मला पोलीस स्टेशनमध्ये बोलविल्याने मी पोलीस ठाणे येथे आतमध्ये जावून गायकवाड साहेब यांचे केबीनमध्ये जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी आमचेमध्ये माझ्याविरूध्द दाखल असे गुन्हयाबाबत चर्चा झाली. त्यावेळी मी गायकवाड साहेबांना "तुम्ही सांगा आता मला, त्या हिशोबान मी करतो" असे म्हणालो. त्यावर गायकवाड साहेब यांनी मला "सांगितलय की तुला.....दोन सांगितलय की" असे म्हणून दोन लाखाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना "दोन लाख रूपये न्हाय, लय होतय" असे म्हणालो. त्यावर गायकवाड यांनी "तुला गुन्हयात देखील मदत करतोय, तुझी गाडी जप्त नाय करणार, बाकीच पण तुला काय सांगितलय नाय अजुन" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "मागच्या वेळेला मी तुम्हाला दोन लाख रूपये दिलत, तेव्हा मला काय वाटल गाडीच आणि माझा" असे म्हणाले. त्यावर गायकवाड साहेब यांनी "नाय, मी तुला काय म्हणल होत, आता गाडी सोडतोय आणि आणि तुला सोडतोय....गाडी तुला नंतर आंणुल द्यायला लागेल" असे बोलणे झाले. त्यावर मी त्यांना "मला वाटल त्यातच तुम्ही मला मदत केली हाय, म्हणून मी तुम्हाला 2 लाख रूपये दिलत" असे म्हणालो. त्यावर गायकवाड साहेब यांनी मला "तुला चार आणि पाच लाख रूपये नाय सांगितलेल.... किंवा दहा लाख रुपये नाय सांगितले....तु पहिले दोन केलेते म्हणून मी फक्त दोनच सांगितलेय.... ते बी साहेबांशी चर्चा करून" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाटील साहेब यांची भेट घालून देणेची विनंती केली असता गायकवाड साहेब यांनी नकार दिला. त्यानंतर गायकवाड साहेब यांनी माझ्याविरूध्द दाखल गुन्हयामध्ये कशा प्रकारे मदत करायची तसेच अर्जामध्ये देखील कशाप्रकारे जबाब द्यायचा याबाबत चर्चा केली. त्यानंतर मी गायकवाड साहेब यांनी पैसे दिल्या नंतर मला त्रास होणार नाही ना, कोणाला फोन जाणार नाही ना अशी विचारणा केली असता गायकवाड साहेब यांनी "कोणालाही नाही, प्लस तुझी चौकशी स्टॉप केली जाईल" असे म्हणाले. त्यानंतर मी गायकवाड साहेब दोन लाख रुपये लय होत असल्याचे सांगून रक्कम कमी करण्याची विनंती केली असता गायकवाड साहेब यांनी रक्कम कमी करणेस नकार देवून "तुला मी जास्त सांगितलेल नाय, पहिले तु दोन केलेस म्हणून मी तुला दोनच





Scanned with OKEN Scanner

सांगितलय...तुला पाच आणि दहा सांगितलेल नाय" असे म्हणाले. त्यावर मी पुन्हा त्यांना रक्कम कमी करणेची विनंती केली. त्यावर गायकवाड साहेब यांनी मी करीत असलेल्या युएसडीटी ट्रेडींगबाबत चर्चा व फ्रॉडचा पैसा हा प्रतिक ने काढला असून तो माझ्या मार्फतीने पैसा गेला असल्याचे सांगून ही चैन ही सायबर फ्राडची चैन अंतर्गत येत असल्याचे सांगून माझ्याविरूध्द सायबर अंतर्गत व फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची भिती घातली. तसेच त्यांनी माझी गाडी जप्त करणार नाय, ना मोबाईल जप्त करणार नाही, मोबाईल जप्त केला तो तपासणीस पाठविला तर तो 6 ते 7 वर्षानी केसचा निकाल लागेपर्यंत मिळणार नसल्याची सांगितले. त्यावर मी गायकवाड साहेब यांना पेमेंटचा विषय केल्यावर माझ्यावर केस बिस पडणार नाय ना? असे विचारले असता गायकवाड साहेब यांनी "काही नाही... केस पडणार नाय...अर्जात आणि तुझी गाडी देखील जप्त करणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर आमचेमध्ये माझ्याविरूध्द दाखल असले गुन्हयाबाबत चर्चा झाली.

त्यानंतर मी गायकवाड साहेब यांना दोन लाख रूपये देत असल्याचे सांगितले असता गायकवाड साहेब यांनी मला "मी तुला फोन नाय करणार, तु स्वत: यायचं" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना किती वाजता येवू दे? असे विचारले असता गायकवाड साहेब यांनी "पाच च्या आत आला पाहिजेस" असे म्हणाले. त्यानंतर आमचेमध्ये युएसडीटी घेतले संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर मी गायकवाड साहेब यांना पाटील साहेब यांची भेट घालून देणेची विनंती केली असता त्यांनी मला पाटील साहेब यांनी त्यांना 3 ते 4 दिवसांमध्ये माझ्याविरूध्द गुन्हा दाखल करणेस सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने गायकवाड साहेब हे पाटील साहेब यांचे केबीनमध्ये गेले व मला केबीनच्या बाहेर थांबविले. त्यानंतर काही वेळाने गायकवाड साहेब हे पाटील साहेब यांचे केबीनमधून बाहेर येवून त्यांचे केबीनमध्ये गेले. मी देखील त्यांचे पाठोपाठ गेलो. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी "साहेब काय नको म्हणत्यात.... गुन्हा दाखल करा म्हणत्यात" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "करून टाका की विषय" असे म्हणालो असता गायकवाड साहेब यांनी "तु पाच वाजेपर्यंत ये....मी बोलतो साहेबांना" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना आज फसवत न्हाय असे म्हणालो. त्यावर गायकवाड साहेब यांनी "सगळं मिठ मसाला लावून तयार आहे... सगळयांचे जबाब, बँकेचे स्टेटमेंट....सगळे रेडी आहे फक्त डीवायएसपींची मंजूरी घ्यायची आहे" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाच वाजेपर्यंत येत असल्याचे सांगितले असता गायकवाड साहेब यांनी मला "पाच च्या आत कधी पण ये" असे म्हणालेने मी, व पंच नं.1 वरूडे असे पलूस पोलीस ठाणे येथून माझेकडील मोपेडने येथून रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 वरूडे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पाटील साहेबांनी पी.एस.आय. महेश गायकवाड यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, पी.एस.आय गायकवाड यांनी माझेविरूध्द दाखल गुन्हयामध्ये मला मदत करण्यासाठी तसेच माझी बी.एम.डब्ल्यु कार जप्त न करण्यासाठी व मी फॉरेक्स ट्रेडींग मधून USDT करन्सी मध्ये पैसे लावून लोकांची फसवुणक करीत असल्याचे सांगून माझ्याविरूध्द सायबर व फसवणुकीचा गुन्हा दाखल करणार अशी भिती घालून माझ्याकडे तडजोडी अंती 2,00,000/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच गायकवाड साहेब यांनी मला लागलीच लाच रक्कम घेवून पलूस पोलीस ठाणे येथे येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेबांनी श्री. महेश गायकवाड, पी.एस.आय. यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी त्यांना घरी जावून रक्कम घेवून येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी माझे घरी जावून माझे शिल्लकीतील 2,00,000/- रूपये घेवून एमआयडीसी पलूस येथील पाण्याचे टाकीजवळ पाटील साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी मी 500/- रूपये दराचे 400 नोटा असे एकुण 2,00,000/- रूपये पाटील साहेब व दोन्ही पंचां समक्ष हजर केले. त्यावेळी श्री. पाटील साहेब यांनी सापळा पथक व पंच नं.2 यांचेकरवी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. पाटील साहेब व मी सही केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावून 1-1 लाख रूपयांचे बंडल माझे पॅन्टचे समोरील दोन्ही बाजुचे खिश्यामध्ये ठेवल्या. व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेबांनी श्री. महेश गायकवाड, पी.एस.आय. यांचेविरूध्द पलूस पोलीस ठाणे येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.19 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे





Scanned with OKEN Scanner

कंबरेस अडकवून पॅन्टचे आतमध्ये सोडला. त्यानंतर मी व पंच नं.1 वरूडे असे माझेकडील अॅक्टीव्हा मोपेड वाहन क्र. एमएच 10 डीवाय 6050 वरून पलूस एमआयडीसी येथून रवाना झालो. माझे पाठोपाठ पाटील साहेब व सापळा पथक हे त्यांचेकडील वाहनाने रवाना झालेत. मी माझी अॅक्टीव्हा मोपेड पलूस गावामधून पलूस पोलीस स्टेशनच्या पार्किंगमध्ये जावून पार्क केली. त्यावेळी मी माझे मोबाईल वरून गायकवाड साहेब यांचे मो.क्र. 9421843402 वर कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी मी त्यांना पोलीस स्टेशन येथे आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी 15 ते 20 मिनीटामध्ये पोलीस स्टेशनला येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे गायकवाड साहेब यांची येण्याची वाट बघीतली. परंतू बराच वेळ झाला तरी गायकवाड साहेब हे आले नसल्याने मी पुन्हा माझे मोबाईल वरून गायकवाड साहेब यांना फोन केला असता त्यांनी मला ते येत असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने गायकवाड साहेब हे त्यांचेकडील हुंडाई औरा या पांढ-या रंगाचे कारमधून आलेचे दिसले. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी मला हाताने इशारा करून पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेतले. त्यावेळी मी व पंच नं.1 वरूडे असे पोलीस स्टेशनमध्ये दाखल होवून गायकवाड साहेब यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी पंच नं.1 यांना हाताने इशारा करून बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी व गायकवाड साहेब हे त्यांचे केबीनमध्ये चर्चा करीत बसलो. त्यावेळी पी.एस.आय. गायकवाड साहेब यांनी हाताने इशारा करून माझ्याकडे पैशाची मागणी केल्याने मी माझे पॅन्टचे समोरील दोन्ही खिश्यामध्ये एकुण 2,00,000/- रूपये अॅंथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे व डावे हाताने बाहेर काढून गायकवाड साहेब यांचेसमोर धरली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे दोन्ही हाताने स्विकारून त्यांचे टेबलचे उजवे बाजूचे ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर गायकवाड साहेब यांनी माझी गुन्हयात वापरले वाहना संदर्भात त्यांचे लॅपटॉपवर जबाब नोंदविला. त्यानंतर आमचेतील बोलणे झालेनंतर मी पोलीस स्टेशनच्या बाहेर पार्किंगमध्ये येवून हातरूमलाने तोंड पसून लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्व नियोजित इशारा केला.

लागलीच पाटील साहेब व सापळा पथक माझेजवळ आले व पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. त्यानंतर पाटील साहेब यांनी पोलीस स्टेशनमध्ये जावून गायकवाड साहेब यांना ताब्यात घेतले. तसेच त्यांचेकडील 2,00,000/- रूपये लाच रक्कम पंचा समक्ष पोलीसांनी ताब्यात घेतली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या पुर्ण करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह पलूस सांगली येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 02.04.2025 रोजीचे 11.38 वा. ते 12.46 वा. च्या पडताळणी कारवाई दरम्यान श्री. महेश बाळासो गायकवाड, वय-36 वर्षे, पोलीस उप निरीक्षक पलूस पोलीस ठाणे यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझेविरूध्द दाखल गुन्हयामध्ये मला मदत करण्यासाठी तसेच माझी बी.एम.डब्ल्यु कार जप्त न करण्यासाठी व मी फॉरेक्स ट्रेडींग मधून USDT करन्सी मध्ये पैसे लावून लोकांची फसवुणक करीत असल्याचे सांगून माझ्याविरूध्द सायबर व फसवणुकीचा गुन्हा दाखल करणार अशी भिती घालून माझ्याकडे स्वत: करीता तडजोडी अंती 2,00,000/- रूपये लाचेची मागणी केली असून, दि. 02.04.2025 रोजीचे 16.19 वा. ते 17.55 वा. च्या सापळा कारवाई दरम्यान श्री. महेश बाळासो गायकवाड, पोलीस उप निरीक्षक पलूस पोलीस ठाणे यांनी त्यांचे कक्षामध्ये माझ्याकडून 2,00,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे, म्हणून माझी श्री. महेश बाळासो गायकवाड, वय-36 वर्षे, पोलीस उप निरीक्षक पलूस पोलीस ठाणे, रा. प्रथमेश अपार्टमेंट, फ्लॅट नं.403, तासगाव कराड रोड, पलूस, ता.पलूस जि.सांगली, मुळ रा. केडगाव, गावठाण, दौंड, ता.दौंड जि.पुणे यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Sushant Ramchandra Patil(I (Inspector)) / DGPSRPM8508

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sushant Ramchand
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSRPM8508

पोलीस स्टेशन ऑफिसर
पहूर पोलीस स्टेशन







Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner